नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४५/२०१७

(श्री. रमेश तुकाराम धुरी व. ५ वि. श्री. गुणाजी सहदेव धुरी व. १६)

## :– नि. १०१ खालील आदेश –:

१. वादी क्र. १ ते ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ व २ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

अर्जातील वादीची कथने थोडक्यात पुढीलप्रमाणे–

२. मौजे वाडीवरवडे, ता. कुडाळ जिल्हा सिंधुदुर्ग येथील श्री देवी भद्रकाली–भराडी तसेच अन्य देवता मिळून श्री . देवी भद्रकाली –भराडी पंचायतन असून सदरचे मंदीराची देवस्थानची सर्व देवकार्ये करण्याचा मतमान (मानपान ) तसेच उत्पन्न भोगण्याचा वादीच्या घराण्याचा वैयक्तिक हक्क आहे. वादी क्र. १ ते ३ यांचे वडीलांनी सदर देवस्थानची देवकार्ये करण्याचा त्यांना वैयक्तिक हक्क आहे अशी हक्कप्रस्थापना होवून त्यामधील प्रतिवादींना कायमची ताकदी होण्याकरीता रे. दि. मु. क्र. ५९/१९६० दाखल केला होता व तो दावा मंजुर करण्यात आलेला होता. तसेच त्या दाव्याच्या न्यायनिर्णयावर दाखल केलेले रे. दि. अपील नं. २/१९९३ मध्ये सदरचा न्यायनिर्णय कायम करण्यात आलेला होता. सदर अपीलाच्या निकालात प्रतिवादी क्र. १ ते १६ यांनी वादी यांना कोणत्याही प्रकारे हरकत करु नये अशी ताकीद या अगोदरच दिली असल्या कारणाने त्यांना देवस्थानमध्ये सामील होता येणार नाही. तरीही प्रतिवादी हे वादींना त्यांचे देवकार्य करण्यास , तसेच मतमान (मानपान ) उपभोगण्यास या–ना–त्या मार्गाने हरकत, अडथळा करीत आहेत. तसेच वादीविरुध्द खोट्या व खोडसाळ तक्रारी दाखल करुन देवस्थानातील शांतता भंग करण्याचा व रितीरिवाजाप्रमाणे चालत आलेले कामकाजास अडथळा

करीत आहेत. प्रतिवादींची असे कृत्ये चालु राहिल्यास गांवाची शांतता भंग होणार आहे.

३. वादी यांचे पुढे असे कथन आहे की , यापूर्वी प्रतिवादी यांनी वेळोवेळी देवस्थानचे सार्वजनिक कार्यक्रम घेऊ नयेत म्हणून मे. तहसिलदार साहेब, मे. प्रांत अधिकारी व मे. जिल्हाधिकारी यांचेकडे वारंवार अर्ज दिलेले आहेत व देवस्थानचे कार्यक्रम कसे होणार नाहीत असे प्रयत्न केलेले आहेत. दिनांक २६/०९/२०२२ पासून श्रीदेवी भद्रकाली भराडीचा जागर व त्यानंतर कोजागिरी पौर्णिमा होणे अत्यंत आवश्यक आहे. यापूर्वी झालेल्या मे. दिवाणी न्यायालयाच्या न्यायनिवाड्याप्रमाणे प्रतिवादी यांना कोणत्याही कार्यक्रमांत सहभागी होता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी अथवा त्यांचे वतीने कोणीही श्रीदेवी भद्रकाली भराडी पंचायतनातील वादींची वर नमुद केलेली कार्यक्रमाची रुपरेषा ही दिनांक २६ /०९/२०२२ ते दिनांक १०/१०/२०२२ या कालखंडातील देवाचा जागर करण्यास, कोजागिरी पौर्णिमा करण्यास , दसरोत्सव करण्यास, त्यावळी देवकार्य करण्यास, मतमान (मानपान ), उत्पन्न वगैरे उपभोगण्यास वादींना हरकत अडथळा करु नये अशी प्रतिवादी क्र. १ ते ३अ, ३ब, ३क, ४ ते ७, ८अ ते ८ड, ९ ते १३अ, १४ ते १६ यांचेविरुध्द तुर्तातुर्त ताकीद होणेकरीता वादींनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

४. प्रतिवादी क्र. १, ४ ते ७, ९ ते ११ व १५ यांनी नि. १०१ कडे सदर अर्जास लेखी म्हणणे दाखल करुन वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज नाकारला आहे. त्यांचे म्हणणे की, सदरचा दावा हा सन २०१७ पासून मुळ नि .५ कडील ताकीद अर्जाचे चौकशीवर प्रलंबित आहे. वादी हे प्रत्येकवेळी ठराविक कालावधीसाठी ताकीद अर्ज दाखल करतात व पुढे दुसरा सण आला की , दुसरा अर्ज दाखल करतात. यावरुन वादींची खोडसाळ वृत्ती दिसून येते. वादी

हे कुळकर घराण्यातील असून प्रतिवादी हे थळकर घराण्यातील आहेत. नि. ३८ कडील पुरशिसमध्ये वादी यांनी सदरची बाब मान्य केली आहे. दिवाणी मुकदमा नं. ५९/१९६० चे दाव्यातील न्यायनिर्णयामध्ये परिच्छेद क्र. १० मध्ये थळकर घराण्याचे हक्क मान्य केले आहेत. त्यामुळे सदर देवस्थानमध्ये थळकरांचे काही हक्क आहेत. सदरचे हक्क हे दाव्याचे अंतिम चौकशीनंतर ठरणार आहेत. त्यामुळे तोपर्यंत प्रतिवादींना जर त्यांची देवस्थानची कामे करण्यास थांबविले तर त्यांचे न्यायहक्कावर गदा येणार आहे व त्यांचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. तसेच देवीची मुर्ती ही भंग पावलेली असून पाषाण उलथून टाकलेले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत दोन्ही पक्षकारांना सण साजरे करण्यास मनाई करणे गावांतील शांतता व सुव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक आहे. वादी हे दाव्याचे चौकशीचे काम लांबवित असून ताकीद अर्ज दाखल करत आहेत. तरी अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

५. वादींनी नि.११७ कडे पुरशिस दाखल करुन प्रतिवादी नं. १६ विरुध्दची मागणी सोडून दिली आहे.

६. प्रतिवादी क्र. २, ३अ ते ३क, ८अ ते ८ड, १२, १३अ व १४ यांनी अर्जावर म्हणणे न दिल्याने सदरचा अर्ज त्यांचे म्हणणेविना चालविण्यात आला आहे.

७. दोन्ही बाजुंच्या परस्पर विरोधी कथनांवरुन माझेसमोर खालील वादप्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारण मिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| **अ. क्र.** | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | वादीस प्रथमदर्शनी केस आहे काय ? | अंशतः होकारार्थी |
| ०२. | सोयीचे समतोलत्व वादीच्या बाजुने झुकते काय ? | अंशतः होकारार्थी |
| ०३. | अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणारे आहे काय ? | अंशतः होकारार्थी |
| ०४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## :– का र ण मि मां सा –:

८. वादीतर्फे सन्माननिय विधिज्ञ श्री . अे. के. निरवडेकर यांचा युक्तीवाद ऐकला, तर प्रतिवादी क्र. १, ४ ते ७, ९ ते ११ व १५ यांचेतर्फे सन्माननिय विधिज्ञ श्री. के. डी. वारंग यांचा युक्तीवाद ऐकला.

**वादप्रश्न क्र. १ ते ३ बाबत–**

९. वादप्रश्न क्र. १ ते ३ हे एकमेकांशी संलग्नीत असलेने त्यांचे विवेचन एकत्रात घेतले आहे.

१०. तुर्तातुर्त मनाई हुकूम हा एक विवेकाधिकार व समन्वयी दाद आहे. वादीला जर तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळवायचा असेल तर , त्याने तीन तत्वे म्हणजे सकृतदर्शनी केस , सोयीचे समतोलत्व त्याच्या बाजुने आहे . तसेच तुर्तातुर्त मनाई न दिल्यास त्याचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे या बाबी शाबीत करणे आवश्यक आहे , त्याचबरोबर तुर्तातुर्त मनाईचा अनुतोष हा समन्यायी असल्याने त्याबाबत अनुतोष मागणी करत असताना न्यायालयापासून कोणतीही बाब लपवून न ठेवता वादीने आपली केस स्पष्टपणे मांडणे आवश्यक आहे.

११. वादीच्या वतीने नि. ०६ कडे रे. दि. मु. नं. ५९/१९६० च्या वादपत्राची सहिसुद नक्कल दाखल केली आहे. नि. ०७ कडे रे. दि. मु. नं. ५९/१९६० च्या कामी झालेल्या न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत आणि नि. ०८ कडे रे. दि. अपील नं. २/१९६३ च्या कामी मा. जिल्हा न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. प्रतिवादी यांनी नि.११८ सोबत मे. कार्यकारी दंडाधिकारी, कुडाळ यांनी दिनांक २३/०९/२०२२ रोजी पारीत केलेल्या मनाई आदेशाची प्रत, तसेच नि. क्र. ११६ सोबत दावा विषयक श्री देवी भराडी या देवस्थानाच्या पाषाणाची स्थिती दर्शविणारी छायाचित्रे, सरपंच यांनी कुडाळ पोलिस ठाणे येथे दाखल केलेल्या प्रथम खबर अहवालाची प्रत, इत्यादी कागदपत्र दाखल केली आहेत.

१२. प्रतिवादींच्या कथनानुसार वादविषयक देवस्थानचे कुळकर व थळकर असे दोन वेगवेगळे मानकरी असून वादी कुळकर वखलातील आहेत तर प्रतिवादी थळकर वखलातील आहेत. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी रे. दि. मु. नं. ५९/१९६० चे निकालपत्रामध्ये नोंदविलेल्या अभिमतावरुन त्या दाव्यातील वादी नं. १ म्हणजे प्रस्तुत दाव्यातील वादींचे वडील तुकाराम कानु धुरी हे कुळकर वखलाचे मानकरी होते तर गणु लक्ष्मण धुरी हा थळकर वखलाचा मानकरी होता.

१३. रे. दि. मु. नं. ५९/१९६० चे कामी कुळकरांच्या तीन वखलांपैकी केवळ प्रस्तुत वादींचे वडील तुकाराम कानु धुरी (त्या दाव्यातील वादी नं. १) आणि कृष्णा महादेव धुरी त्या दाव्यातील वादी नं . ३) यांना वादविषयक देवस्थानमध्ये सणाच्या वेळी सर्व प्रकारचे कार्य करण्याचे व मतमान , मानपान उपभोगण्याचे, देणग्या स्वीकारण्याचे हक्क आहेत असे ठरविण्यात आले आहे.

रे. दि. मु. नं. ५९/१९६० चे कामी झालेल्या न्यायनिर्णयाविरुध्द त्या दाव्यातील प्रतिवादींनी तत्कालीन मा. जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांचेकडे रे. दि. अपील नं. २/१९६३ चे अपील दाखल केले होते. सदरचे अपील नामंजुर करुन रे. दि. मु. नं. ५९/१९६० चे कामी दिलेला न्यायनिर्णय कायम ठेवण्यात आला आहे. रे. दि. अपील नं. २/१९६३ च्या कामी झालेल्या न्यायनिर्णयाविरुध्द पुढे अपील करण्यात आलेले नाही. सबब रे. दि. मु. नं. ५९/१९६० चे कामी झालेला न्यायनिर्णय आजही अस्तित्वात आहे. रे. दि. मु. नं. ५९/१९६० चे कामी झालेल्या न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता तुकाराम कानु धुरी आणि कृष्णा महादेव धुरी यांचे वादविषयक देवस्थानमध्ये असलेल मतमान व मानपान हे केवळ कुळकर घराण्याशी संबंधीत आहेत. सदर देवस्थानमधील थळकर घराण्याला असलेल मानपान, हक्क स्वतंत्र आहेत. एकंदरीत वादीचे वडील तुकाराम कानु धुरी आणि कृष्णा महादेव धुरी यांना श्री देवी भद्रकाली भराडी देवस्थानातील कुळकर घराण्याचे मानकरी म्हणून जाहिर करण्यात आले आहे. त्यांचे पश्चात सदरचे मानपान वादींचेकडे चालत आलेले आहेत. कुळकर घराण्याचे मानपान उपभोगण्याचा हक्क माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी पुराव्याअंती ठरवले असल्याने आणि जिल्हा न्यायालयाने अपीलाच्या कामी कायम केले असल्याने वादींची कुळकर घराण्याचे मतमान व मानपान सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. सबब कुळकर घराण्याच्या मतमान व मानपानाबाबत न्यायाचा तराजु वादींच्या बाजुने अंशतः झुकतो . त्यामुळे दिनांक २६/०९/२०२२ ते दिनांक १०/१०/२०२२ या कालखंडातील श्री. देवी भद्रकाली भराडी देवीच्या जागर करण्यास , कोजागिरी पौर्णिमा करण्यास, दसरोत्सव करण्यास, देवकार्य करण्यास , वादींच्या कुळकर घराण्यास मतमान , उत्पन्न वगैरे उपभोगण्यास प्रतिवादी हरकत अडथळा करत

असल्यास सदर कारणापुरती तुर्तातुत मनाई देवून वादींचे मानपान सुरक्षित राखणे आवश्यक ठरते. वादींच्या कुळकर घराण्याचे असलेल मानपान सुरक्षित राखण्याबाबत तुर्तातुर्त मनाई आदेश न दिल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब मी वादप्रश्न क्र. १ ते ३ चे निष्कर्ष ''अंशतः होकारार्थी'' नोंदवित आहेत.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत–</u>**

१४. माझे वरील विवेचनावरुन दिनांक २६/०९/२०२२ ते दिनांक १०/१०/२०२२ या कालखंडातील श्री. देवी भद्रकाली भराडी देवीच्या जागर करण्यास, कोजागिरी पौर्णिमा करण्यास, दसरोत्सव करण्यास, देवकार्य करण्यास, वादींच्या कुळकर घराण्यास मतमान , उत्पन्न वगैरे उपभोगण्यास वादींच्या कुळकर घराण्याला असलेले मानपान उपभोगण्यास प्रतिवादींच्याकडून हरकत अडथळा करु नये याकरीता तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेस वादी पात्र आहेत. परंतु, प्रस्तुत प्रकरणात दाखल कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, दिनांक २३/९/२०२२ रोजी कार्यकारी दंडाधिकारी, कुडाळ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १८७३ चे कलम १४४ (१ ) नुसार दिनांक २५/०९/२०२२ ते दिनांक १०/११/२०२२ रोजी पर्यंत मौजे वाडी वरवडे, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील श्री देवी भराडी देवस्थानच्या परिसरात मनाई आदेश पारीत केलेला आहे. अशा परिस्थितीत सदर आदेशातील अटी व शर्तीस अधीन राहून वादी यांनी दिनांक २६/०९/२०२२ ते दिनांक १०/१०/२०२२ या कालखंडातील श्री. देवी भद्रकाली भराडी देवीच्या जागर , कोजागिरी पौर्णिमा, दसरोत्सव, देवकार्य करण्याचा निर्णय घेतल्यास त्याप्रसंगी प्रतिवादींनी वादींच्या कुळकर घराण्याला असलेल्या मतमान व मानपानास हरकत, अडथळा करु नये अशी तुर्तातुत

मनाई देण्यात येत आहे. सबब मी मुद्दा क्र. ४ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी दिनांक २३/९/२०२२ रोजी कार्यकारी दंडाधिकारी, कुडाळ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १८७३ चे कलम १४४ (१ ) नुसार दिलेल्या आदेशातील अटी व शर्तीस अधीन राहून दिनांक २६/०९/२०२२ ते दिनांक १०/१०/२०२२ या कालखंडातील श्री. देवी भद्रकाली भराडी देवीच्या जागर , कोजागिरी पौर्णिमा, दसरोत्सव, देवकार्य कारण्याचा निर्णय घेतल्यास त्याप्रसंगी प्रतिवादी नं. १ ते १५ यांनी अगर त्यांच्यातर्फे अन्य इसमांनी वादींच्या कुळकर घराण्याला असलेल्या मतमान व मानपानास हरकत, अडथळा करु नये असा त्यांचेविरुध्द तुर्तातुत मनाई आदेश देण्यात येत आहे.

३. वादी यांनी उत्सव साजरा करताना दिनांक २३ /९/२०२२ रोजी कार्यकारी दंडाधिकारी, कुडाळ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १८७३ चे कलम १४४ (१ ) नुसार दिलेल्या आदेशातील अटी व शर्तींचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

४. या अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसावयाचा आहे.

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2022.09.30 18:06:50 +0530

दिनांक– ३०/०९/२०२२

(अ. जो. बाचुळकर)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.